महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळातील "सहायक महाव्यवस्थापक" हे एक पद समर्पित (रद्द) करुन त्याऐवजी "कंपनी सचिव" हे पद निर्माण करण्याबाबत.....

महाराष्ट्र शासन
विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग,
शासन निर्णय क्रमांक : इमाव-२०१८/प्र.क्र.७३/महामंडळे,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४००० ३२.
दिनांक : १७ सप्टेंबर, २०१९.

वाचा : वित्त विभागाचे पत्र क्र.पदनि-२०१९/प्र.क्र.३९/१९/आपुक, दि.०३ ऑगस्ट, २०१९.

शासन निर्णय

नवीन पदनिर्मिती, पदांचे पुनरुज्जिवन व पदांचे आढावे इत्यादी प्रस्तावांची सखोल तपासणी करण्यासाठी मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या उच्चस्तरीय सचिव समितीची दि.०८ जुलै, २०१९ रोजी बैठक झाली. सदर बैठकीमध्ये महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळातील "सहायक महाव्यवस्थापक" (वेतनश्रेणी ९३००-३४८००+ग्रेड पे ४४००) हे एक पद समर्पित (रद्द) करुन त्याऐवजी "कंपनी सचिव" (वेतनश्रेणी ९३००-३४८००+ग्रेड पे ४४००) हे समान वेतनश्रेणीचे पद निर्माण करण्यास समितीने मान्यता दिली आहे. तसेच, हे कंपनी सचिव पद विभागातील वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ या महामंडळाचे कामकाज पाहील. त्यासाठी कंपनी सचिवाचे स्वतंत्र पद निर्माण करु नये, असेही निर्देश समितीने दिले आहेत. त्यानुसार, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्ग वित्त आणि विकास महामंडळातील "सहायक महाव्यवस्थापक" (वेतनश्रेणी ९३००-३४८००+ग्रेड पे ४४००) हे एक पद समर्पित (रद्द) करुन त्याऐवजी "कंपनी सचिव" (वेतनश्रेणी ९३००-३४८००+ग्रेड पे ४४००) हे समान वेतनश्रेणीचे पद निर्माण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. यासाठी होणारा खर्च मागणी क्र. झेडजी-३, २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ०३, मागासवर्गीयांचे कल्याण, १०२, आर्थिक विकास, (०३) स्वयंसेवी संस्थांना सहायक अनुदान (०३) (०१) महाराष्ट्र राज्य इतर मागास वर्ग वित्त व विकास महामंडळाला सहाय्यक अनुदान (अनिवार्य) (२२२५ ई ८५७), ३६, सहायक अनुदाने (वेतन) या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ४०२/आपुक, दिनांक २१ ऑगस्ट, २०१९ अन्वये वित्त विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्याचा संकेतांक क्रमांक २०१९०९१८१६३९५६९९२२ असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

RAVINDRA VASANTRAO GURAV

Digitally signed by RAVINDRA VASANTRAO GURAV
DN: c=IN, st=Maharashtra,
2.5.4.20=0030b22364370f4d96ab251b7263219586c0069b661c3f9cd6fd67e55000ce92, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI,
serialNumber=9dfb7aefbd9e82b129c324d567b46e1d853d93c38d6e222c868eac72ecd12784, ou=VJNT OBC AND SBC DEPT, o=GOVERNEMENT OF MAHARASHTRA, cn=RAVINDRA VASANTRAO GURAV
Date: 2019.09.18 16:45:24 +05'30'

(रविन्द्र गुरव)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत :

१) महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा), मुंबई.
२) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ, मुंबई.

४) व्यवस्थापकीय संचालक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, मुंबई.
५) कक्ष अधिकारी (आपुक), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प/रोखशाखा), विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
७) स्वीय सहायक, प्रधान सचिव (विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई.
८) निवडनस्ती (महामंडळे).

*****